# भारताचे परराष्ट्र धोरण : ब्रिक्स संघटना आणि आव्हाने

**प्रा. डॉ. किशोर कल्लापा म्हेत्री**
*राज्यशास्त्र विभाग*
*गोगटे वाळके कॉलेज बांदा,*
*ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग*

**प्रस्तावना :**
प्रस्तुत शोधनिबंधामध्ये भारताचे परराष्ट्र धोरण आणि ब्रिक्स परिषद याचा आढावा घेतला आहे. सदरच्या शोधनिबंधामध्ये आंतरराष्ट्रीय संबंध या घटकांशी संबंधित स्वातंत्र्यापासून ते आजपर्यंत भारताच्या विदेश नीतीमधील सातत्य व बदलांचा आढावा घेणे क्रमप्राप्त आहे. देशाच्या सामाजिक – आर्थिक प्रगतीसाठी इतर देशांशी मैत्रीपूर्ण संबंध राखणे महत्त्वाचे आहे. असे संबंध विशिष्ट तत्त्वे आणि धोरणांवर आधारित असतात. अशा तत्त्वे व धोरणांना परराष्ट्र धोरण असे म्हणता येईल.

- **भारताचे परराष्ट्र धोरणः**

भारताचे प्राचीन काळापासून जगातील इतर देशांशी सौहार्दाचे संबंध होते. पण ब्रिटिश राजवटीमध्ये त्यांच्या वसाहतवादी हेतूने प्रेरित परराष्ट्र धोरणामुळे भारताच्या इतर देशांशी असणाऱ्या संबंधामध्ये बदल झाला. भारताच्या परराष्ट्र धोरणाची स्थूल जडणघडण स्वातं०यपूर्व काळातच झाली. ब्रिटिशांच्या परराष्ट्र धोरणावर टीका करून राष्ट्रीय चळवळीतील धुरिणांनी सार्वभौमत्व, प्रादेशिक अखंडता आणि शांततापूर्ण सहअस्तित्व या तत्वांवर आधारित परराष्ट्र धोरणाचा पुरस्कार केला. स्वातंत्र्यप्राप्तीपासून ते आजपर्यंत देशाच्या परराष्ट्र धोरणनिर्मितीवर पंतप्रधानांचा विशेष प्रभाव दिसून येतो. स्वातंत्र्यानंतर पहिले पंतप्रधान व परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार नेहरू यांनी ब्रिटिशांच्या परराष्ट्र धोरणातील कटू अनुभवापासून बोध घेत देशाचे परराष्ट्र धोरण आखले, अलिप्ततावाद, वसाहवाद आणि साम्राज्यवादाला विरोध, वर्णद्वेशाला विरोध, जागतिक ' ांतता, प्रादेशिक सहकार्य, निःशस्त्रीकरणाला पाठिंबा ही भारतीय परराष्ट्र धोरणाची तत्त्वे आहेत.

स्वातंत्र्यानंतर देशाची स्थिती बिकट होती. पाकिस्ताान अमेरिकाप्रणीत लष्करी गटात सामील झाला व साम्यवादी सोव्हिएत रशियाच्या तत्कालीन नेतृत्वाला भारतातील नेतृत्व बुजुर्ग वाटत होते. तसेच भारतीय नेत्यांनाही साम्यवादातील अतिरेक मान्य होण्यासारखे नव्हते. यामुळे भारताने कोणत्याही गटाशी आपली बांधिलकी न दाखवता अलिप्तवादाचा पुरस्कार केला भारताच्या या धोरणाचा पुढे लाभही झाला. कारण देशाला दोन्ही महासत्ताकडून सहकार्य मिळाले. भारताने वसाहवादाचा विरोध करून आशिया, लॅटिन अमेरिका व आफ्रिकेतील राष्ट्राच्या स्वातं०य लढयाला पाठिंबा दिला. तसेच आर्थिक सामाज्यवादाला विरोध करून समानता व पारदर्शिकता यावर आधारित नवीन आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्थेची (एन. आय. ई. ओ.) मागणी केली. संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या शांतता आणि विकासाच्या तत्त्वावर भारताचा दृढ विश्वास होता. परिणामी युनोप्रणीत शांतता मोहिमामध्ये भारताने सक्रिय सहभाग घेतला.

पाकिस्तान व चीनशी झालेल्या युध्दानंतर व भारताच्या पाश्चिमात्य देशांशी असणाऱ्या असमान संबंधामधून नेहरूप्रणीत आदर्शवादी परराष्ट्र धोरणाच्या मर्यादा दिसून आल्या, इंदिरा गांधीच्या काळामध्ये परराष्ट्र धोरणामध्ये आदर्शवाद ते वास्तववाद असा बदल झाला. वाढती सैन्यशक्ती व वेगाने आकार घेत असलेला आण्विक कार्यक्रम, बांग्लादेशाच्या निर्मितीतील भूमिका शांततामय आण्विक चाचणी, अण्वस्त्रप्रसार बंदी (एन. पी. टी.) करारावर सही करण्यास नकार व भारत व सोव्हिएल रशिया यांच्यातील करार हा बदल दर्शवतो.

नव्वदीच्या दशकामध्ये सोव्हिएल रशियाचे पतन, शीतयुध्दाची समाप्ती झाली. याचवेळी भारत आर्थिक संकटातून वाटचाल करत होता. परिणामी, जागतिक बॅक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या माध्यमातून अमेरिकेच्या संपर्कात यावे लागले. यानंतर भारताने एलपीजी मॉडेलचा अंगीकार करून अर्थव्यवस्था खुली केली.

या घटनेमुळे भारताने परराष्ट्र धोरण व्यूहात्मक बाबींकडून भू –आर्थिक बाबींकडे झुकले. या संरचनात्मक बदलामुळे भारताची परकीय मदतीकडून थेट परकीय गुंतवणूकीकडे वाटचाल सुरू झाली. याचवेळी भारताने 'पूर्वेकडे पहा' या धोरणाचा (लुक इस्ट पॉलिसी) अंगीकार केला. यावेळी पूर्व आशियानी देशामध्ये वेगाने आर्थिक विकास घडून येत होता. यामुळे पर्यटन, व्यापार आणि आर्थिक सहकार्य यांना चालना देण्याचा प्रयत्न होता.

यानंतर 'गुजराल सिध्दांताच्या साह्ययाने शेजारील देशाशी देवाणघेवाणीची अपेक्षा न करता संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न होता. यामुळे बांग्लादेशासोबत गंगा पाणी वाटप करार झाला. यानंतरचा कालखंड प्रबुध्द राष्ट्रीय हिताने प्रेरित होता. भारताने 1998 मध्ये अणू चाचण्या केल्या. इस्त्रायलशी संबंध प्रस्थापित केले व सोबतच पश्चिम आशियाची राष्ट्रांबरोबर ऊर्जा राजनय सुरू ठेवला. भारताने नेहमी बहुध्रुवी जागतिक व्यवस्थेचा पुरस्कार केला. ब्रिक्स, आय. बी. एस. ए., जी–4 संस्थाद्वारे उदयोन्मुख आर्थिक सत्तांबरोबर सहकार्याला बळ देण्याचा प्रयत्न केला. तसेच अमेरिका – भारत अणुकरारानंतर अमेरिकेशीही जवळचे संबंध प्रस्थापित केले.

आपण आतापर्यंत भारतीय परराष्ट्र धोरणाचा ढोबळपणे आढावा घेतला. यामध्ये एक बाब नेहमी ध्यानात घ्यावी की, गेल्या काही दशकांपासून आंतरराष्ट्रीय स्तरावर होत

असलेले बदल त्यांचा भारतावरील प्रभाव व या बदलांना प्रतिसाद म्हणून आपल्या परराष्ट्र धोरणामध्ये केलेला बदल व रणनीती यांचे सूक्ष्म आकलन होणे महत्त्वाचे आहे.

केंद्रातील भाजपप्रणीत सरकारचा परराष्ट्र धोरणावर अधिक भर आहे. नरेंद्र मोदींच्या नव्या मंत्रीमंडळामध्ये परराष्ट्र धोरण व राष्ट्रीय सुरक्षा या विषयांशी निगडित पदांचा भार या क्षेत्रातील तज्ज्ञ नोकरशहांकडे दिला आहे. याचाच अर्थ सरकारच्या दृष्टीन आंतररा" ट्रीय संबंध, परराष्ट्र धोरण व राजनय हे महत्त्वपूर्ण विषय आहेत. मात्र या सरकारने यूपीए सरकारची धोरणे तशीच पुढे चालू ठेवली आहेत. त्याचा कल पाश्चिमात्य रा" ट्रांकडे झुकलेला दिसतो. तसेच शेजारील देशांशी संबंधांना खूप महत्त्व दिले आहे. भारताच्या 'नेबरहूड फर्स्ट' या धोरणाने सध्या वेग घेतला आहे. कारण दक्षिण आशियातील श्रीलंका, बांगलादेश, भूतान आणि मालदीव या देशांमध्ये सध्या भारतीय राज्याला व धोरणाला अनुकूल असे राजकीय पक्ष व नेते सत्तेत आहेत. उदा. बांग्लादेश जमीन हस्तांतरणाचा करार, सागरमाला, मौसम या परियोजनांवरून राष्ट्रीय सत्तेवर भर दिला जात असल्याचे स्पष्ट होते. देशांतर्गत आणि परराष्ट्र धोरणाच्या व्यापक एकीकरणाचा दृष्टिकोन दिसत आहे. उदा. मेक इन इंडिया, पंतप्रधान परदेश दौऱ्यामध्ये योग, भारतात रूजलेली बौध्द व इस्लामिक संस्कृतीची परंपरा यावर भर देतात. यावरून सॉफ्ट पॉवर वाढण्याकडे कल दिसून येतो. पूर्वीच्या 'लुक ईस्ट पॉलिसी' ऐवजी 'ॲक्ट ईस्ट' धोरण व 'लुक वेस्ट' धोरणाचे सूतोवाच केले आहे. भारत हा जगातील सर्वाधिक ऊर्जा सुरक्षा हा भारताच्या परराष्ट्र धोरणाचा सर्वोच्च बिंदू बनला आहे. सध्याच्या परराष्ट्र धोरणामध्ये सातत्याबरोबर बदलांची काही लक्षणे दिसत आहेत. यामध्ये व्यापाराबरोबर सुरक्षा, संस्कृती, भू – राजकीय व भू – सामरिक स्वरूपाचे विषय फार महत्त्वाचे आहेत. भारताच्या परराष्ट्र धोरणांपैकी ब्रिक्स संघटना हा घटकदेखील तितकाच महत्वाचा आणि परिणामकारक मानाला जातो.

- **ब्रिक्स संघटनाः**

**ब्रिक्स** हे उदयोन्मुख राष्ट्रीय अर्थव्यवस्थांच्या महासंघाचे शीर्षक आहे. त्याचे घटकराष्ट्र ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका आहेत. या देशांच्या इंग्रजीत **बी, आर, आय, सी** आणि **एस** या आद्याक्षराच्या नावावरून या गटाला नाव देण्यात आले आहे. गोल्डमन सॅक्स या अमेरिकन बहुराष्ट्रीय वित्तीय संस्थेचे माजी अध्यक्ष जिम ओ'निल यांनी 2001 मध्ये 'ब्रिक्स' ही संज्ञा सर्वप्रथम वापरली होती. त्याची स्थापना 2009 मध्ये झाली आणि पाच सदस्य देश आहेत. मूळतः 2010 मध्ये दक्षिण आफ्रिकेच्या समावेशापूर्वी हे ''ब्रिक'' म्हणून ओळखले जात होते. ब्रिक्स ही एक व्यापारी, राजकीय आणि सांस्कृतिक संघटना आहे. डॉलरला पर्याय म्हणून एक स्थिर चलन निर्माण करणे, हे या संघटनेचे उद्दिष्ट आहे. जागतिक आर्थिक स्थिती सुधारणे, वित्तीय संस्थांमध्ये सुधारणा घडवून आणणे आणि भविष्यात या पाच देशांतील सहकार्य अधिक वाढवणे, ही या संस्थेची मुख्य उद्दिष्ट आहेत. ब्रिक्स देशांची लोकसंख्या ही जगाच्या एकूण लोकसंख्येच्या 50 टक्के आहे. या संस्थेचे कायम सदस्य असलेले पाचही देश हे विकसनशील देश आहेत आणि अलिप्तता, समानता आणि परस्परांचा फायदा या उद्देशांना ते बांधील आहेत. अफगाणिस्तान, अर्जेंटिना, इंडोनेशिया, टर्की, इजिप्त, इराण, नायजेरिया, सूदान सिरिया, बांगला देश आणि ग्रीस यांसारख्या अनेक देशांनी ब्रिक्सचे कायम सदस्य बनण्याची इच्छा व्यक्त केली आहे.

रशिया वगळता ब्रिक्सचे सर्व सदस्य विकसनशील किंवा नवीन औद्योगिक देश आहेत ज्यांची अर्थव्यवस्था झपाट्याने वाढत आहे. ही राष्ट्रे प्रादेशिक आणि जागतीक बाबींवर लक्षणीय प्रभाव पाडतात. 2019 पर्यंत, पाच ब्रिक्स राष्ट्रे जगाच्या 42% लोकसंख्येचे प्रतिनिधीत्व करतात आणि एकत्रित परकीय चलन साठ्यात युएस + 4 ट्रिलियन योगदान देण्याचा अंदाज आहे. या राष्ट्रांची एकत्रित जीडीपी 1.5 ट्रिलियन यूएस डॉलर आहे. ब्रिक्स देश जागतिक जीडीपी मध्ये 23% योगदान देतात आणि जागतिक व्यापारात सुमारे 18ः मध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. याला आर – 5 म्हणूनही ओळखले जाते कारण या पाच देशांच्या चलनाचे नाव 'आर' ने सुरू होते.

- **रचना आणि कार्य :**

आंतरराष्ट्रीय नाणे निधी आणि जागतिक बॅक या दोन्ही जागतिक वित्तीय संस्थांवर पाश्चिमात्य देशांचे वर्चस्व आहे. त्यामुळे या संस्थांना पर्याय निर्माण करणे, हाच ब्रिक्सच्या स्थापनेमागे मुख्य हेतू होता. या उद्दिष्टासाठी ब्रिक्सचे सदस्यदेश स्थापनेपासून दरवर्षी व" ार्षातून एकदा एकत्र येत असतात. याबाबत साकल्याने विचार केल्यानंतर या देशांनी न्यू डेव्हलपमेंट बॅक (एन. डी. बी.) आणि कॉटिन्जन्ट रिझर्व अरेंजमेंन्ट (सी. आर. ए.) या दोन वित्तीय संस्थांची स्थापना केली. या संदर्भावरील ठरावांवर 2014 साली स्वाक्षऱ्या करण्यात आल्या आणि 2015 पासून त्यांचे काम सुरू झाले.

एन. डी. बी. पूर्वी ब्रिक्स डेव्हलपमेंट बॅक या नावाने ओळखली जात असे. ही बहुराष्ट्रीय विकास बॅक आहे. ब्रिक्सच्या सदस्यदेशांतर्फे ती चालवली जाते. या बॅकमार्फत प्रामुख्याने पायाभूत प्रकल्पांसाठी दरव" र्षी साधारणपणे 34 अब्ज डॉलर्सचे कर्ज दिले जाते. या बॅकेचे मुख्य कार्यालय दक्षिण आफ्रिकेत आहे. या बॅकेचे भागभांडवल सुरूवातीला 50 अब्ज डॉलर असेल आणि नंतर ते 100 अब्ज डॉलरपर्यंत वाढवण्यात येईल. सदस्यदेश सुरूवातीला प्रत्यकी 10 अब्ज डॉलरचे भागभांडवल बॅकेत जमा करणार आहेत.

रोखीच्या उपलब्धतेवीरल जागतिक स्तरावरील ताण कमी करण्यासाठी सी. आर. ए. ही यंत्रणा उभी करण्यात आली. जागतिक स्तरावरील आर्थिक तणवामुळे सदस्यदेशांपुढे काही समस्या उभी राहिल्यास त्यातून

मार्ग काढण्यासाठी ही यंत्रणा निर्माण करण्यात आली आहे. सामान्यपणे या यंत्रणेकडे जागतिक बॅंकेची स्पर्धक म्हणून पाहिले जाते. दक्षिण गोलार्धातील देशांच्या परस्पर सहकार्याचा उत्तम नमुना म्हणून एन. डी. बी. कडे पाहिले जाते.

2016 मध्ये ब्रिक्सच्या भारतात झालेल्या शिखर बैठकीत सदस्य देशांच्या नागरिकांमध्ये सुसंवाद असावा, असे आग्रही प्रतिपादन भारताने केले होते. या शिखर बैठकीच्या कार्यक्रमात सदस्यदेशाच्या चित्रपटांचा महोत्सव, कृषी आणि पर्यावरण खात्यांच्या मंत्र्यांची बैठक, पहिले औदयोगिक प्रदर्शन आणि पहिली फुटबॉल स्पर्धा यांचा समावेश करण्यात आला होता. राजकीय कारणामुळे चीन औद्योगिक प्रदर्शनात सहभागी झाला नाही. या शिखर बैठकीत सदस्य देशांनी दहशतवादाचा कडाडून निषेध केला. न्यू डेव्हलपमेंट बॅंक आणि क्रिडा परि" ाद स्थापन करणे, कृषी आणि रेल्वे संबंधीच्या संशोधनावर भर देणे, जागतिक व्यापार संघटनेबरोबर (डब्ल्यू. टी. ओ.) स्पर्धा करू ' ाकेल. अशी प्रभावी व्यापारी यंत्रणा उभी करणे इत्यादी बाबींवर बैठकीत चर्चा करण्यात आली.

- **ब्रिक्स परिषदः**

सुरूवातीच्या चार ब्रिक्स राष्ट्रांच्या (ब्राझील, रशिया, भारत आणि चीन) परराष्ट्र मंत्र्यांची सप्टेंबर 2006 मध्ये न्यूयॉर्क ' ाहरात बैठक झाली आणि उच्चस्तरीय बैठकांची मालिका सुरू झाली. 16 जून 2008 रोजी एक मोठा चतुर बैठक संपन्न झाले होते.

2010 मध्ये, दक्षिण आफ्रिकेने ब्रिक्स गटात सामील होण्यासाठी प्रयत्न सुरू केले. आणि त्याच व" ाीं ऑगस्टमध्ये त्याच्या औपचारिक प्रवेशाची प्रक्रिया सुरू झाली. 24 डिसेंबर 2010 रोजी दक्षिण आफ्रिका अधिकृतपणे ब्रिक ग्रुपचे सदस्य राज्य बनले, ब्रिक देशांनी गटात सामील होण्यासाठी औपाचारिकपणे आमंत्रित केल्यानंतर गटाचे नाव बदलून 'ब्रिक्स' असे करण्यात आले, ज्यामध्ये ''एस'' दक्षिण आफ्रिकेचे प्रतिनिधित्व करत आहे. एप्रिल 2011 मध्ये, दक्षिण आफ्रिकेचे रा" ट्राध्यक्ष जेकब झुमा, चीनच्या सान्या येथे 2011 ब्रिक्स शिखर परि" ादेत पूर्ण सदस्य म्हणून उपस्थित होते.

पहिल्या ब्रिक शिखर परि" ादेचे पुढील देशाचे नेते उपस्थित होते. ब्रिक ग्रुपिंगची पहिली औपचारिक शिखर बैठक 16 जून 2009 रोजी रशियाच्या येकातेरिनबर्ग येथे झाली, लुईझ इनसिओ लुला दा सिल्वा–ब्राझील, दिमित्री मेदवेदेव–रशिया, मनमोहन सिंग – भारत आणि हू जिंताओ – चीन यांच्या अध्यक्षतेखाली, जागतिक आर्थिक परिस्थिती सुधारणे आणि वित्तीय संस्थांमध्ये सुधारणा करणे हा शिखर परिषदेचा मुख्य मुद्दा होता. रशिया येथे रशियाच्या अध्यक्षतेखाली ब्रिक्स देशांची 2020 सालची 12 वी शिखर परिषद कोविड 19 च्या महामारीमुळे ऑनलाइन पध्दतीने पार पडली. आतापर्यंत एकूण 12 ब्रिक्स शिखर परिषद विविध सदस्य सदस्य रा" ट्रांन संपन्न झाल्या आणि 13 वी ब्रिक्स शिखर परि" ाद 2021 मध्ये भारताच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. 2012 आणि 2016 नंतर भारत तिसऱ्यांदा ब्रिक्स शिखर परि" ादेचे आयोजन करणार आहे.

- **ब्रिक्स संघटनेपुढील आव्हाने आणि भारतः**

चीनसोबतचे ताणलेले संबंध, अमेरिकेसोबतची वाढती जवळीक आणि रशिया–चीनमधील संबंधाच्या पार्श्वभूमीवर भारताची 'ब्रिक्समधील भूमिका, महत्वाचे ठरणार आहे.

रशियाच्या अध्यक्षतेखाली ब्रिक्स देशांची यंदाची 2020 सालची शिखर परिषद कोविड 19 च्या महामारीमुळे ऑनलाइन पध्दतीने पार पडली. 'जागतिक स्थैर्य, सामायिक सुरक्षा आणि नाविन्यपूर्ण विकासाकरता ब्रिक्स भागीदारी' ही ब्रिक्स देशांच्या नेत्यांच्या बैठकीची संकल्पना होती. ब्राझीलमध्ये 2019 सालच्या परिषदेच्या शेवटी राश्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांनी परराष्ट्र धोरण समन्वय वाढविण्याकडे आम्ही विशेष लक्ष देऊ, असे आवर्जून म्हटले होते. यासोबतच 2015 साली स्वाक्षरी केलेल्या आर्थिक भागीदारी आणि 2025 पर्यंत 'ब्रिक्स'च्या सहकार्याची रणनीती ठरविण्याचा उल्लेखही त्यांनी केला होता.

ब्रिक्स देशांच्या दृष्टिकोनातून रशियाच्या व्यापक सामरिक उद्दि" टांमध्ये आर्थिक कारभार हाकणाऱ्या प्रचलित संस्थांमध्ये सुधारणा करणे, मल्टी–वेक्टर पॉलिसीचा पाठपुरावा आणि ब्रिक्स सदस्यांसह परराष्ट्र धोरण सहकार्याचा विस्तार करणे यांचा समावेश यंदाच्या परि" ादेत होता. यातूनच आंतरराष्ट्रीय पातळीवरील देशाचे स्थान मजबूत करण्यासाठीचा रशियाचा प्रयत्न आहे. पण साथ रोगाच्या पार्श्वभीवर ही उद्दी" टे साध्य करण्यासाठी फार घाई केली जात आहे. या सर्वांचा 'ब्रिक्स'वर एक संघटना म्हणून होणारा परिणाम आणि त्यासंबंधी नमूद केलेल्या उद्दी" टांकडे दुर्लक्ष करता येणार नाही.

- **महत्वाचे करारः**

ब्रिक्स देशांच्या आर्थिक भागिदारी 2025 च्या करारावर यावेळी स्वाक्षरी केली गेली. या कराराचे पाच वर्षांच्या कालावधीनंतर पुनरावलोकन केले जाणार आहे. व्यापार, गुंतवणूक आणि वित्त या तीन क्षेत्रांवर प्राधान्याने लक्ष केंद्रीत करणे, डिजिटल अर्थव्यवस्था आणि शाश्वत विकास या गोष्टींसाठी सहकार्य करणे या गोष्टींचा करारात समावेश करण्यात आला आहे. 2015 सालच्या रणनीती सदस्य देशांच्या भविष्यातील आर्थिक विकासाला प्राधान्य देणे आणि महत्वाच्या क्षेत्रांवर लक्ष केंद्रीत करण्याचे निश्चित करण्यात आले होते. त्यामुळे यावेळीच्या करारात व्यापर, गुंतवणूक आणि वित्त या तीन क्षेत्रांची निवड का गेली हे यातून स्पष्ट होते.

'ब्रिक्समधील सदस्य देशांच्या व्यवसायांना सहकार्य करण्याची वचनबध्दता यापुढेही कायम राहील असे या करारातून निश्चित करण्यात आले आहे. 'डब्ल्यू. टी. ओ', आयएमएफ' आणि जागतिक बॅंकेच्या सुधारणे यासोबतच आकस्मिक राखीव व्यवस्था (सीआरए) आणि 'न्य

डेव्हलपमेंट बॅक (एनडीबी) यांच्यातील सुधारणेसाठी प्रयत्न करणे. अत्याधुनिकरण आणि तंत्रज्ञान, डिजिटलायझेशनसमोरील आव्हाने आणि चौथी औदयोगिक क्रांती, शाश्वत विकास, हवामान बदल, उर्जा, पायाभूत सुविधा आणि अन्न सुरक्षा यांचाही समावेश आहे. कोरोनाच्या चाचण्या आणि लशीच्या निर्मितासाठी रशियाने ब्राझील, भारत आणि चीनसोबत राखलेला समन्वय हे ब्रिक्स देशांमधील सहकार्याचे प्रतिक असल्याचे मानले जात आहे. तसेच कोरोनाच्या संकटाला सामोरे जाण्यासाठी 'एनबीडी' ने सदस्य देशांच्या मदतीसाठी 10 अब्ज डॉलर्सची तरतूद केली आहे आणि बॅकेच्या सभासदांच्या विस्ताराची चर्चा सुरू असताना ही गोष्ट 'एनडीबी' बॅकेसाठी देखील अत्यंत महत्वाची आहे.

'ब्रिक्समधील सदस्य देशांसाठी यासारखे अनेक विषय महत्वाचे आहेत. ज्यात एकमेकांना सहकार्य करणे हेच फायदयाचे ठरेल आणि आर्थिक क्षेत्र हा सर्वच बाबींचा गाभा राहीला आहे. 'एनडीबी' आणि 'सीआरए' सारख्या यंत्रणेमुळेच सर्वाधिक यश मिळाले आहे. उदाहरणार्थ, चीनने ब्रिक्स देशांना 'डिजिटल ट्रान्सफॉर्मेशनसाठी विशे" ातः 5–जी, आर्टिफिशिअल इंटेलिजन्स (एआय), डिजिटल इकोनॉमी आणि इतर गो" टींमध्ये सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

भारत आणि चीनमध्ये सीमेवरील तणावामुळे भारताने चीनला 5–जी च्या चाचण्यांसाठी मज्जाव केला आहे. भारत–चीन सीमेदरम्यान तणावपूर्व घटनानंतर भारताने शेजारील देशांमधून होणाऱ्या गुंतवणूकीसाठी केंद्र सरकारची मान्यता अनिवार्य असेल असा निर्णय जाहीर केला होता. याचा अर्थ असा की ब्रिक्स देशांमध्ये गुंतवणूक वाढवण्याचे उद्दीष्ट असतानाही भारतात गुंतवणूक करताना चीनला परवानग्यांचा अडथळा पार करावा लागणार आहे. भारताच्या या निर्णयामुळे जुलैपर्यंत चीनचे सुमारे 200 प्रस्ताव केंद्रीय गृहमंत्रालयाकडे प्रलंबित आहेत.

दुसरीकडे ब्रिक्स देशांमध्ये व्यापार वाढविण्याच्या दृष्टीने रशियाला काही प्रमाणात यश आले आहे. 2019 मध्ये ब्रिक्स देशांमधील एकूण व्यापार 125 अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचला. त्यात चीनचा तब्बल 110 अब्ज डॉलर्सचा वाटा आहे. भारतासोतबच्या व्यापारात वाढ झाली असली तरी ती 10 ते 11 अब्ज डॉलर्सपर्यंत मर्यादीत राहीली आहे. भारतात ब्रिक्समधील सदस्य देशांच्या व्यापाराचा एकूण वाटा 2018–19 या सालात 114.1 अब्ज डॉलर्स इतका राहीला आहे. यात चीनचा 87.1 अब्ज डॉलर्स इतका सर्वाधिक वाटा राहीला आहे.

2014 साली रशियाचा ब्राझील आणि दक्षिण आफ्रिकेसोबतचा व्यापार अनुक्रमे 6.25 अबज व 975 दशलक्ष डॉलर्स इतका राहिला होता. 2019 पर्यंत यात आणखी घट होऊन 4.61 अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचली होती. नंतर यात 1.11 अब्ज डॉलर्सने सुधारणा देखील झाली. ब्राझील आणि दक्षिण आफ्रिकेतील द्वीपक्षीय व्यापार 2010 मध्ये 2.06 अब्ज डॉलर्स इतका होता. पुढे 2019 मध्ये यात घट होऊन 1.88 अब्ज डॉलर्स इतका झाला. अशी माहिती 'यूएन कॉमट्रेड' च्या अहवालात नमूद आहे. अर्थात बिक्स देशांसमोरील आव्हाने आर्थिक भागीदारीच्या धोरणाची व्यवहार्यता टाळत नाहीत. पण आर्थिक निर्णय घेताना अमेरिका आणि चीनमधील द्विपक्षीय संबंधाची परिस्थिती लक्षात घ्यावी लागेल. विशेषतः या दोन प्रमुख देशांमध्ये दिवसेंदिवस द्विपक्षीय संबंधामध्ये बिघाड होत आहे. यामुळे ब्रिक्स देशांच्या सहकार्याच्या पर्यायांवर मर्यादा येत आहेत.

ब्रिक्स परिषदेत यंदा दहशतवादाविरूध्दच्या जागतिक प्रयत्नांना हातभार लावण्याच्या उद्देशाने सदस्य देशांनी दहशतवादविरोधी करारावरही स्वाक्षरी केली आणि सदस्य देशांमधील संबंधांना आणखी बळकटी मिळाली. यामध्ये संयुक्त राष्ट्र सुरक्षा मंडळाने सूचीबध्द केलेल्या दहशतवादी संघटनांची माहिती एकमेकांना पुरवणे, दहशतवादी संघटनांना होणारे आर्थिक सहाय्य रोखण्यासाठी प्रयत्न करणे आणि दहशतवादाचा प्रसार रोखणे अशा उद्दीष्टांचा समावेश आहे. 2021 सालच्या ब्रिक्स परि" ादेचे अध्यक्षपद भारत भूषविणार असून दहशतवादला आळा घालण्याचे काम आणखी पुढे घेऊन जाणार असल्याचे भारताने नमूद केले आहे. रशियाने याबाबत केलेल्या घोषणांध्ये यावेळी कोणतेही नाविन्य नव्हते. रशियाने सुरक्षेच्या बाबतीत गेल्याच वर्षीच्या घोषणांची पुनरावृत्ती केल्याचे पाहायला मिळाले. अर्थ, आंतर–सरकारी सहकार्य, सांस्कृतिक आणि वैयक्तिक पातळीवर होणारे व्यवहार याबाबतही गेल्याच वर्षीचे धोरण रशियाकडून सादर केले गेले.

- **आंतरराष्ट्रीय परिस्थीतीः**

जागतिक पातळीवरील सध्याच्या परिस्थितीमुळे ब्रिक्स संदर्भात रशियाचे उद्दीष्टही अधिक गुंतागुंतीची बनली आहेत. कारण ही जागतिक संस्था ज्या काळात स्थापन केली गेली ती सध्याच्या काळात मूलतः बदलली आहे. ब्रिक्स देशांनी बहुउद्देशीय जागतिक व्यवस्थेची स्थापना करण्याच्या उद्देशाने अनेक उद्दीष्टांची यादी केली हे खरे आहे. परंतु, वास्तवात तशी परिस्थिती दिसत नाही. विशेषतः चीनने आपले सामर्थ्य दाखवत इतर सदस्य देशांना तुलनेने मागे टाकले आहे. अलिकडच्या काळात साथ रोगाच्या महामारीत सीमेवरील चीनच्या आक्रमक भूमिकेमुळे भारतासोबतचे संबंध बिघडले गेले आहेत.

आतापर्यंत चीनने ब्रिक्समध्ये वर्चस्व गाजवण्याचा प्रयत्न केलेला नाही आणि भारत व चीन या दोघांनीही ब्रिक्सच्या चौकटीत राहून सहकार्य देखील केले आहे. पण द्विपक्षीय मतभेद हाताळण्यासाठीचे धोरण अद्याप अस्पष्ट आहे. दरम्यान, अमेरिका आणि चीन यांच्यातील संबंध भवि" यात आणखी बिघडत गेल्यास याचे परिणाम या दोन मोठया शक्तींबाबतच्या भारत व रशियाच्या परराष्ट्र धोरणावरही होतील. 'ब्रिक्स'मधील तीन मोठ्या शक्तींच्या कृतीमुळे या संस्थेच्या कामाची गती आणि भवि" यावर परिणाम होतील एवढे मात्र नक्की यामुळे जागतिक कारभारातील भूमिकेवर किंवा बिगर–पश्चिमी

गट म्हणून उभे राहण्याच्या संस्थेच्यां उद्दीष्टांवर मर्यादा येऊ शकतात आणि याचा संस्थेवरही नकारात्मक परिणाम होऊ शकतो. आतापर्यंत 'ब्रिक्स'ने या आव्हानांना सामोरे जाण्यात यश मिळवले आहे. परंतु बदलती जागतिक व्यवस्था पाहता पूर्वीच्या तुलनेत संस्थेत संतुलन राखण्याचे काम अधिकच कठीण होऊन बसेल.

- **निष्कर्ष:**

ब्रिक्स ही तशी नवी संघटना असली, तरी आपल्या उद्दी" टांच्या दिशेने तिने अल्पावधीत चांगलीच प्रगती केली आहे. आपण विकसनशील देशांचे समर्थक आणि हितचिंतक आहोत आणि जागतिक शांतता रक्षणात आमचा महत्त्वाचा वाटा आहे, असा सदस्यदेशांचा दावा आहे. अमेरिकेच्या प्रभावाखाली असलेल्या जागतिक बॅंक आणि आंतरराष्ट्रीय नाणे निधी या संस्थांशी स्पर्धा करण्याचा ब्रिक्सचा जोरदार प्रयत्न चालू आहे.

रशियाच्या अध्यक्षतेखाली ब्रिक्स देशांची 2020 सालची ब्रिक्स शिखर परिषद मुख्यतः मागील वर्षाच्या आर्थिक गुंतवणूकीवर आधारित होती. यातून हे स्पष्ट होते की सदस्य देशांना एकमेकांचे हितसंबंध माहित आहेत. ज्यावर ते प्रस्थापित यंत्रणा आणि संस्थांच्या स्वरूपात सहकार्य करण्यास इच्छुक आहेत. तसेच जागतिक व्यवस्था उभारी घेत असताना ब्रिक्स सदस्यांना सहकार्याच्या क्षेत्रांचा शोध सुरू ठेवणे सोयीस्कर वाटत आहे. महत्वाचे म्हणजे नवीन विश्वव्यवस्था तयार होणे अद्याप बाकी आहे. तरीही ब्रिक्स 2020 च्या शिखर परिषदेत वर नमूद केलेल्या आव्हानांना तोंड देण्यासाठी भवि" यात काय करता येईल याबाबत काहीच प्रकाश टाकला गेला नाही, असे नक्कीच म्हणता येईल. त्यामुळे सध्याचे संस्थाकरण संघटनेला पुढे नेण्यासाठी पुरेसे आहे का? आणि बदलत्या जागतिक आव्हांनापुढे ब्रिक्स कशी विकसीत होईल हे पाहणे उत्सुकतेचे असणार आहे. 2014 सालच्या युक्रेन प्रकरणामुळे रशियाचे पश्चिमेकडील देशांशी बिघडलेले संबंध आणि आर्थिक परिणामांना सामोरे जाताना येत्या वर्षात रशियन सामरिक उद्दिष्टे पूर्ण करण्यात ब्रिक्स यशस्वी ठरते का हे देखील पाहावे लागेल.

भारताने याआधीच कोविड–19 मुळे जागतिक व्यवस्थेवर झालेला परिणाम पाहता परराष्ट्र धोरणांवर पुनर्विचार करण्यास सुरूवात केली आहे. 2021 मध्ये ब्रिक्सचे अध्यक्षपद भारताकडे असणार आहे. त्यावेळी चीनसोबतचे ताणले गेलेले संबंध, अमेरिकेसोबतची वाढती जवळीक आणि रशिया–चीनमधील संबंधाच्या पार्श्वभूमीवर भारताची 'ब्रिक्स'मधील भूमिका पाहणे अतिशय महत्वाचे असणार आहे.

- **संदर्भ:**

1. *डॉ. शैलेंद्र देवळाणकर, समकालीन जागतिक राजकारण, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद.*
2. *प्रा. बी. वाय. कुलकर्णी, आंतरराष्ट्रीय संबंध, विद्या प्रकाशन, नागपूर.*
3. *डॉ. डी. ए. मांढरे, डॉ. पी. आर. पाटील व प्रा. बी. डी. तोडकर, भारताचे परराष्ट्र धोरण व राष्ट्रीय सुरक्षितता, प्रतिमा पब्लिकेशन, अहमदनगर.*
4. *डॉ. शैलेंद्र देवळाणकर, भारताचे परराष्ट्रीय धोरण, सातत्य आणि स्थित्यंतर, सकाळ प्रकाशन पुणे, नोव्हेंबर 2016.*
5. *हर्षद भोसले व शुभाराज बुवा, आंतरराष्ट्रीय संबंध, शेठ प्रकाशन, मुंबई, जानेवारी 2019.*
6. *वसंत र. रायपुरकर, आंतरराष्ट्रीय संबंध, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.*
7. *डॉ. पंडित नलावडे, आंतरराष्ट्रीय संबंध, कैलास पब्लिकेशन, औरंगपुरा औरंगाबाद.*
8. *प्रा. जॉन्सन बोर्जेस, संयुक्त राष्ट्र आणि इतर आंतरराष्ट्रीय संघटना, डायमंड बुक डेपो, पुणे.*
9. *https://mr.Wikipedia.org*
10. *https://www.loksatta.com*